**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
**सौभाग्य मंगल कार्यालय**
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २२४ वा | शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड - एक राष्ट्रभक्त व्यक्तिमत्व

## मोहोळ येथे विनामूल्य भव्य आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबीर

### स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशीय संशोधन संस्था व रेड स्वस्तिक सोसायटीचा मानवतावादी उपक्रम

सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुका येथील सामाजिक जाणिवेचे मानबिंदू व उच्चतम संस्कारांची सर्जनशीलता ठरणारे स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मोहोळ येथे होत असलेल्या विनामूल्य आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या एकूणच समाजनिष्ठ महत्वाकांक्षा व विलक्षण सेवाकायार्दाखल केलेला शब्दगौरव...

यशस्वी व्यक्तीची व्याख्या करतांना, 'खुपदा आणि खुप हसणारे, बुद्धिमान लोकांचा आदर करणारे आणि मुलांचं प्रेम जिंकणारे, प्रामाणिक समिक्षकाकडून वाहवा मिळविणारे आणि निसगार्ला दाद देणारे, दुसऱ्यांमधल्या चांगल्या गोष्टींची दखल घेणारे, हे एक आयुष्य छान सुकर गेलं कारण आपण ते जगलो असं मानणारे लोक हे यशस्वी समजावेत', असे राल्फ वालड्रॉ इमर्सन यांनी म्हटले आहे. त्यांच्या या व्याख्येनुसार विश्वाच्या प्रचंड पसाऱ्यातला आपण एक सुक्ष्म कण आहोत ही जाणीव सतत जीवंत ठेवून अत्युत्कट भावना, दयाळू मन, सहकारवृत्ती, प्रसंगावधान, सर्वधर्मसमभाव, परोपकार, महत्वाकांक्षा या गुण वैशिष्ट्यांना आपलसं करुन मानवी सद्गुणांचे आशास्थान ठरणारे अत्युच्च व्यक्तिमत्व म्हणजे सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड होत. समाज संवेदनांची हृदयस्पर्शी ओळख ठरलेले कै. संदिपान दादा गायकवाड म्हणजे स्वभावाने मृद् अन तात्विक मनोवृत्तीने विचार करणारे, विवेचनाने व माहित असलेल्या गोष्टीवरून निर्णय घेणारे, अत्युच्य आकलनशक्ती असणारे, अनाथ-दिव्यांग, अंधांना मदत करणारे, संतपरंपरेचा प्रचार करणारे, स्वच्छता संस्काराचे पुरस्कर्ते व अत्यंत स्वाभिमानी जाणिवेने आणि त्या अंगाने सामाजिक वास्तवाचा विलक्षण संवेदनशीलतेने शोध घेणारे स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड हे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात जन्मलेले व आपल्या आयुष्यात राष्ट्रविकासाला प्राधान्य देणारे आशादायी व्यक्तिमत्व होते. आजही त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे जाणिवेचा सच्चेपणा अन भावनेचा ओलावा यांचा हृदयस्पशी संगम, हीच ओळख समाजमनामध्ये निर्माण झाली आहे. आज त्यांचे पुण्यस्मरण.

वस्तुतः पुण्यस्मरण हा त्या व्यक्तीच्या प्रेरणादायी आयुष्याला स्मरण करण्याचा दिवस. याच अथार्ने स्वतः अंतर्मुख होण्याची व योग्य त्या व्यक्तीविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची मनुष्य जन्माला लाभलेली ती एक निसर्गदत्त देणगीच म्हणावी. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तशी पुष्कळ माणसं भेटतात. पण रूढ नात्यांच्या मयार्दा अथवा अपेक्षा नसणारी, साध्या हसण्याइतकी सुंदर आणि सद्भावनेइतकी आश्वासक खरी खुरी जिव्हाळ्याची माणसं क्वचितच लाभतात. सोलापूर जिल्ह्याला तर अशी माणसं स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड या पितृछत्राच्या निमित्ताने लाभली.

"Well is his life worth writing, Worth interpreting and even in the new dialect of new times, re-writing and re-interpreting". (याचा अर्थ - त्यांच्याविषयी लिहावे असे त्यांचे जीवन आहे. इतरांना सतत समजावून सांगावे असे. नव्या युगाच्या नव्या बोलीत, पुन्हा नव्याने लिहावे आणि परत नव्याने उलगडून दाखवावे असे त्यांचे जीवन आहे. - थॉमस कार्लाइल) या ओळींप्रमाणे असणारे स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांचे कर्मनिष्ठ व्यक्तीमत्व विविधांगी आहे. त्यांच्या छायेच्या संपर्कात राहून ते अनेकांनी अनुभवलं आहे व त्यांच्याच या उन्नत, उदात्त व उत्तुंग संस्कारांचा अभ्युदय वारसा त्यांच्या कुटुंबाकडून जोपासाला जात असल्याचे मी स्वतः अनुभवले आहे.

वस्तुतः सर्वसाधारण आकलनशक्तीच्या बुध्दीमत्तेतून स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांचा स्वभाव अभ्यासता येणं कठीणच. त्यांना ओळखण्यासाठी आपला अनुभवप्रदेश विस्तीर्ण असणं गरजेचं आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केल्यास दिव्यत्वाची प्रचिती येते.

आनंदी स्वभावाचा गुण काही व्यक्तींमध्ये जन्मजात असतो. स्वाभाविक गुणधर्म म्हणून हे लोक इतरांपेक्षा अधिक आनंदी राहतात . बिनधास्त व बेधडकपणे जगल्याने कोणत्याही माणसाच्या व्यक्तिगत यश मिळविण्यावर फारसा परिणाम होत नसतो . अशी माणसं स्वतःच्या वर्तणुकीची आणि कृतीची जबाबदारी स्विकारणारी असतात. त्यांचा आयुष्याविषयीचा दृष्टीकोण सकारात्मक असतो. त्यामुळे ही माणसं व्यक्तीगत पातळीवर आणि व्यावसायिकदृष्ट्या अधिक कार्यक्षम ठरतात. या चाकोरीत स्वतःला घडविणारे स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांच्या जीवनातील एकूणच प्रयत्नांना एक अनोखा मानवी स्पर्श आहे. त्यांनी शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला येवून स्वबळावर शून्यातून विश्वनिर्मिती केली. वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी चुलते श्री. दत्तात्रयजी गायकवाड यांच्यासोबत स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली व अत्यंत प्रतिकूल वातावरणामध्ये सुद्धा प्राण




तारण ठेवून मोहोळ या आपल्या गावात तिरंगा ध्वज फडकविण्याचे शौर्य गाजविले. यावरूनच त्यांच्या ठायी असलेला अंतःर्मनाचा अनोखा मानवी स्पर्श दिसून येतो. आहार - विश्रांती व कष्ट यातून उत्तम व निरोगी आरोग्य हा विचार अनेक दशकांपूर्वी प्रत्यक्ष अंगी उतरवून स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांनी तो दृढ व समृध्द केला आहे. न्याय, भ्रष्टाचारमुक्त भारत व स्त्री शिक्षणाच्या विचाराला त्यांनी आयुष्यभर महत्व दिले आहे. घरातील स्त्री शिकली म्हणजे घर पुढे जाते व त्यातूनच समाज प्रगत होतो या विचाराने जगलेले स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांना त्यांच्या आयुष्यात सौ. तारामतीताई या पत्नी म्हणून लाभल्या. या दाम्पत्याने त्यांच्या आयुष्यात राष्ट्रहिताच्या पवित्र विचारधारेचे सदैव समर्थन केले आहे.

स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांच्या ठायी असलेली समाजकल्याणाची तळमळ पयार्याने मानवकल्याणाचा विचार त्यांच्या कृतीतून डोकावतो. त्यांची शिकवण हीच एक नैतिक शक्ती आहे. त्यांच्या समाजनिष्ठ विचारांचं प्रतिबिंब म्हणजे त्यांची समर्पण वृत्ती होय. सुमारे 50 वषार्पूर्वीच्या दशकामध्ये सहकार या विषयाला आधारभूत मानून कृषी उत्पन्न बाजार समिती, ग्रामपंचायत, विकास सोसायटी, इत्यादीच्या शीर्ष पदांवर राहून त्यांनी कार्य केले आहे. स्वतः करीत असलेल्या कार्याच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी विलक्षण प्राविण्य तर प्राप्त केलेच, त्याचसोबत आपल्या न्यायप्रिय व निष्ठावंत कायार्तून समाजमनावर अमीट छाप निर्माण केली. अत्यंत निरपेक्ष व निगर्वी भावातून ते समाजाच्या पयार्याने देशाच्या उत्कर्षाकरीता झटले. ग्रामविकासातून राष्ट्रविकासाकडे नेणारी त्यांची अंगभूत संकल्पना त्यांनी आयुष्यभर जोपासली. ग्रामविकासाकरीता सलोखा व नितिमत्ता सर्वात जास्त गरजेचे आहे, असे ते नेहमी म्हणत. व्यक्तिगत लाभाच्या अनेक बाबी त्यांनी नाकारल्या. कृषी - सहकार या क्षेत्रामध्ये आयुष्याचे अविरत वर्षे त्यांनी खर्ची घातले. म्हणूनच सामाजिक जाणिवेचा नितळ, देशभक्त अन् सर्जनशील अविष्कार म्हणून स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांना ओळखले जाते.

मन व जीवनाच्या व्यवस्थापनासह सामाजिक सेवा क्षेत्राचे यशस्वी व्यवस्थापन स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये केले होते. जीवनातील आदर्शाचा शोध जेव्हा एखाद्या व्यक्तीजवळ अथवा विचाराजवळ जावून थांबतो, आपल्या अलौकीक कर्तृत्वानं अशी व्यक्ती जेव्हा समाजाचा आधारस्तंभ बनते, अशा विचारांच्या व्यक्तीचे अमृतकण समाजाची गात्र न गात्र पुलकीत करतात, मनाला उभारी आणतात, जीवनात प्रेरणेची ज्योत प्रज्वलित करतात, अशा परंपरेच्या व्यक्ती आपल्या कायार्न मैलाचा दगड ठरतात. म्हणूनच समाजाप्रति असणारी संवेदनशीलता अन बांधिलकीची निःस्सीम भावनाच अशा व्यक्तींना गुणवंत, यशवंत, कीतीर्वंत करीत असते. स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांचे विचार अन कृती उत्तम संस्कारीक धन आहे. त्यांच्या आदर्शवादी आचार - विचारांची बीजे समाजमनात दूरवर रुजल्या गेली पाहिजेत. नवीन पिढीला त्याचा खुप फायदा होईल. आज त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या प्रेरणेचे सुंदर लेणे अधिक बहरदार होवो, हाच आशावाद!

स्वातंत्र्य सेनानी कै. संदिपान दादा गायकवाड यांच्या याचं संस्कारांमुळे आजही त्यांची पुढची पिढी मोहोळ तालुक्यातील युवकांमध्ये स्वयंरोजगाराची भावना वाढीस लागावी, त्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांनी आत्मसन्मान व स्वाभिमानानं उभं राहावं या समाजकल्याणाच्या तळमळीनं कार्य करीत आहे. मानवसेवेच्या जाणीवेने व्यथित होणाऱ्या आजच्या या पिढीने आपले जीवन परंपरागत पध्दतीने खर्ची न घालता समाजकायार्ला समर्पित केले आहे. पंढरपूरच्या सुक्ष्म तेजोमय अध्यात्मिक वातावरणामध्ये संत परंपरेच्या वैचारिक सौंदर्याला प्रभावित होवून समस्त गायकवाड कुटुंबाने जीवन जगण्याचा पथदर्शी मार्ग निवडला आहे. वस्तुतः त्यांच्यावर झालेल्या याच अध्यात्मिक संस्कारांमुळेच आजही गायकवाड कुटुंबियांच्या तारांगणामध्ये आनंदाचे 'वीर' अवतरले आहेत.

एकूणच स्वातंत्र्य सैनिक कै. संदिपान दादा गायकवाड यांचा जीवनवाद विलक्षण प्रेरणादायी ठरतो. कारण त्यांच्या जीवनविषयक तत्वज्ञानामध्ये ज्ञानाला आदर आहे, हुशारीला महत्व आहे, स्वाभिमानाला सन्मान आहे, आत्मविश्वाला श्वास आहे, कष्टाला बळ आहे आणि त्या बळाला यशाची झेप आहे.

**- ॲड. (डॉ.) क्रांती कुमार महाजन,**
मो.: +91 86004 98778

**स्वातंत्र्यसेनानी संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्था , मोहोळ , जिल्हा सोलापूर , महाराष्ट्र ( रजि.) व रेड स्वस्तिक सोसायटी यांचा संयुक्त उपक्रम**

**भव्य मोफत आरोग्यतपासणी व रोगनिदान महाशिबिर - 2025**
**( विनामूल्य तपासणी , उपचार , औषधे व शस्त्रक्रिया )**

RED SWASTIK
ek aarogya abhiyan...


हृदयरोग | यकृत | किडनी | मेंदू | मनके | अर्धांगवायू | स्त्रीरोग | ब्रेनस्ट्रोक | नेत्र | रक्तदाब | मधुमेह | थायरॉईड | कृत्रिम अंग ( हात - पाय ) प्रत्यारोपण

**सहभागी नामवंत डॉक्टर्स व हॉस्पिटल्स**

जहांगीर हॉस्पिटल , पुणे
Dr. Ashok B. Ghone
( Senior Honorary Consultant & HOD , Social Services )
Dr. J. S. Dugal
( Senior Cardiologist )
Dr. Ram Patil
( Consultant Head & Neck , Surgical Oncologist )
Dr. Mandar Patil
( DNB , Neuro Surgeon Consultant )







निरामय पॅरालिसिस सेंटर अँड फॉउंडेशन , पुणे
Dr. Sunil Salve

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय मोहोळ केंद्र , सोलापूर
Dr. Manjiri Patil
Optometrist

मॅक्सकेअर मल्टिकेअर हॉस्पिटल , वैराग , सोलापूर
Dr. Pravin Masal
( DGO , Gynaecologist & Obstetrician )

• रुग्णांनी महाशिबिराला येतांना जुने रिपोर्ट्स व हॉस्पिटल्सच्या फाईल्स सोबत आणाव्यात .
• वरील सर्व आजारांवर उल्लेखित नामवंत हॉस्पिटल्सच्या सुविधा विनामूल्य लाभणार आहेत .

मोफत आरोग्यशिबिराचा लाभ घ्या

महाशिबीर दिनांक : 12 एप्रिल , 2025 ( शनिवार ) || वेळ : सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत
स्थळ : स्वातंत्र्यसेनानी संदिपान दादा गायकवाड सभागृह , सोलापूर रोड ,मोहोळ , तालुका मोहोळ , जिल्हा सोलापूर

मोफत आरोग्यशिबिराचा लाभ घ्या

**नाव नोंदणीसाठी संपर्क**

| श्री. राकेश देशमाने | श्री. शैलेश गावडे | श्री. अनिल नाईक | श्री. विजय कोकाटे | श्री. मुस्ताक शेख |
|---|---|---|---|---|
| +91 96899 57196 | +91 98503 45773 | +91 98600 24622 | +91 98905 94577 | +91 98606 59586 |

## संपादकीय

# दिशाभूल करणे थांबवा

वक्फ दुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असले, तरी त्या विरोधातील आवाज थांबलेला नाही. बहुतांश राज्यांत निवडक ठिकाणी निदर्शने केली जात आहेत. पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार आणि जाळपोळ झाली. राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एक निवेदन जारी केले आहे. ते भयानक आहे. आपण बंगालमध्ये वक्फ कायदा लागू करू देणार नाही, असे ममता यांनी म्हटले आहे. ते गांभीयार्ने घेण्याची आवश्यकता आहे. संसदेत आणि संसदेबाहेर काँग्रेसनेही वक्फ कायद्याला विरोध दर्शवला आहे. लोकशाहीत विरोध करणे हा अधिकार आहे; मात्र झालेला कायदा पाळणारच नाही हा गंभीर धोका आहे. मुस्लीम समुदायाला जर कायदा खटकत असेल तर सनदशीर मागार्ने निषेध करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांच्या संस्था आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी राज्य आणि केंद्र सरकारशी चर्चा करून आपली भूमिका मांडली पाहिजे. मौलाना मदनी यांनीही तेच सांगितले आहे. मात्र, येथे विषय असा आहे की नेमका विरोध मुस्लीम समुदायाचा आहे की त्यांच्या आडून मतपेढीचे राजकारण करणाया पक्षांचा आहे? या समुदायातील बहुतांश लोकांनी पूर्वीपासून त्यांचा ज्यांच्यावर विश्वास आहे अशा राजकीय पक्षांच्या भूमिकेला साथ देत निषेधाचा मार्ग पत्करला आहे. यात त्यांचेच नुकसान होण्याची शक्यता अधिक असून त्यांची दिशाभूल थांबवणे आवश्यक आहे. तसेच त्यांना जे काही खटकत असेल त्यावर चर्चा करून त्यांचे समाधान होईल असा मार्ग त्यातून काढणे सरकारचेही काम आहे.

अल्पसंख्याक समुदायाच्या नावाने वषार्नुवर्षे जे राजकारण केले गेले त्यालाच धोका निर्माण झाल्यामुळे कायदा झुगारण्याचे जाहीर करत लोकशाहीच्या संकेतांनाच आव्हान देण्यापर्यंत राजकीय पक्षांची मजल गेली आहे. वक्फच्या नावाने ज्या पद्धतीने राजकीय आणि सामाजिक संघर्ष सुरू झाला आहे तो टाळता आला असता. त्याकरता विधेयक संसदेत आणण्याच्या अगोदर सर्वसहमती घडवली जायला हवी होती. म्हणायला संयुक्त संसदीय समिती स्थापन केली गेली. या समितीने विविध घटकांशी चर्चा केली; पण त्यांनी आमच्या सूचना फेटाळल्या अशी संबंधितांची तक्रार आहे व तेच आताच्या संघर्षाचे कारण आहे. जर सहमती घडवून विधेयक मांडले गेले असते, तर मुळात रात्री दोन अडीच वाजेपर्यंत सरकारला त्यावर सभागृहात चर्चा करावी लागली नसती आणि आपल्या रास्त सूचनांची दखल घेतली गेल्याचे समाधान विरोधकांना मिळाले असते, तर त्यांनीही विषय रस्त्यावर नेण्याचा निर्धार केला नसता. सर्वोच्च न्यायालयात आता ढिगाने याचिका दाखल झाल्या आहेत व केंद्र सरकारलाही कॅव्हेट दाखल करावे लागले आहे. बंगालच्या मुर्शिदाबाद येथे ज्या प्रकारे हिंसाचार झाला आणि नंतर तो थोपवण्यासाठी तेवढाच हिंसक मार्ग स्वीकारावा लागला ते पाहणे कष्टदायकच म्हणावे लागेल. कायद्याला विरोध करताना मुस्लीम समुदायातील जाणकारांच्या म्हणण्याकडेही दुर्लक्ष होते आहे.

जाणकारांच्या म्हणण्यानुसार, मुस्लीम समुदायात मागास, विकासापासून वंचित राहिलेला वर्ग मोठा आहे. मुस्लिमांच्या एकूण संख्येत या वगार्ची संख्या 85 टक्के आहे. या वगार्ला ना राजकीय हिस्सेदारी मिळाली ना अन्य लाभ पदरात पडले. आमिषांना भुलल्यामुळे सुरुवातीपासूनच समुदायाने त्यांच्या प्रमुख चेर्हयांनी ज्यांना सांगितले त्या चेर्हयांना आणि त्या पक्षांना मतदान केले. तथापि, समुदायातील मूठभर वगार्चीच भराभराट होत गेली. या समाजातील एका बुद्धजीवी व्यक्तीचे विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, की वक्फकडे एवढी संपत्ती आहे की त्याचा योग्य वापर केला गेला तर देशातील एकही मुस्लीम गरीब राहणार नाही. एवढेच काय त्यातून एकही हिंदूसुद्धा गरीब राहणार नाही. बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी 1980 च्या दशकातील उदाहरण देत हाच मुद्दा मांडला आहे. प्रख्यात अजमेर दग्यार्चे चिश्ती, ऑल इंडिया सुफी सज्जादनशी काउंसिल, मुस्लीम राष्ट्रीय मंच, भारत फर्स्ट आदी संस्था आणि व्यक्तींनीही हीच भूमिका अधोरेखित केली आहे. ऑल इंडिया इमाम ऑर्गनायझेशनच्या प्रमुखांनीही वक्फ कायद्याचे समर्थन केले आहे. कायद्याचे समर्थन करणार्यांच्या यादीत जमियत हिमायत उल इस्लाम, पसमांदा मुस्लीम समाज आदींचाही समावेश आहे. समुदायातीलच एका राष्ट्रीय संयोजकांच्या म्हणण्यानुसार, वक्फ बोडार्ची देशभरात साडेआठ लाख एकर जमीन आहे. त्यावर समुदायातील बड्या, प्रभावशाली केवळ 200 लोकांचा ताबा आहे. काही धार्मिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तर ज्यांनी मालमत्तांवर कब्जा केला आहे त्यांची नावेच जाहीर केली आहेत व त्यानंतर समुदायाच्या भल्याच्या बाजूने बोलर्णाया मुस्लीम नेत्यांना आणि विचारवंतांनाच लक्ष्य केले जाते आहे. हा पूर्णतः राजकीय प्रकार आहे. मुळात समुदायाला गोंधळात ठेवायचे असा प्रयत्न होताना दिसतो आहे.

मुस्लीम समुदाय आणि केंद्र सरकार किंवा केंद्र सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात परस्पर विश्वासाचा अभाव आहे. तो स्पष्ट दिसतो आहे व त्याचे कारण आहे न झालेला संवाद. हा संवाद योग्यपणे साधला गेला असता आणि सर्व शंकांचे निरसन झाले असते, तर संघर्ष सुरूच झाला नसता. कायदा मानणारच नाही असे ममतांना बोलावे लागले नसते. आज ममता बोलल्या, उद्या अन्य कोणी बोलेल. त्यातून ते त्यांचे राजकारण आणि मतपेढी साधतील मात्र यातून गरीब आणि वंचित मुस्लिमांचे भले होणार आहे का, याचा राजकारण्यांनी विचार करावा आणि चूकत असतील तर दुरूस्ती करावी.

# आमचे आजोबा दादा

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती असं व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे आजोबा दादा कै. संदिपान दादा गायकवाड एक सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या दादाचे जीवन बालपणापासूनच अतिशय कष्टात गेले. त्यांना त्यांच्या मनगटातील बळावर विश्वास होता. यामुळेच त्यांनी शुन्यातून विश्व निर्माण केले. कुसळे असलेल्या माळरानावर स्वतः मोट हाणून नंदनवन फुलवले. दादांना शेती करण्याची आणि जनावरे जोपासण्याची खुपच आवड होती. त्यांच्या कर्तृत्वाला साजेसा असाच कृषिपुरस्कार स्मृतीदिनानिमित्ताने आमच्या मामाश्री कडून दिला जात आहे. ही अतिशय अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वयाच्या १४ व्या वर्षी चुलते दत्तात्रय गायकवाड यांचेसोबत मोहोळ गावात तिरंगा फडकवला, भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना डबा देणे, त्यांच्या घरच्या अडीअडचणी सोडविणे, अशी कामे केली. सन २००४ साली जिल्हाधिकारी वेणूगोपाल रेड्डी यांच्या हस्ते स्वातंत्र्य सैनिकाचे सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सर्व प्रशासकीय अधिकारी, पै पाहुणे यांना बोलावून आपल्या कष्टाने फुलवलेल्या नंदनवनासारख्या मळ्यात हुरडा खाऊ घालणे, आदरातिथ्य करणे त्यांना फार आवडत होते. आपला आहार, विश्रांती आणि कष्ट याबद्दल त्यांनी कायम नियम पाळले. त्यामुळे वयाच्या ९१ व्या वर्षापर्यंत, नव्हे अखेरपर्यंत ते सुंदर निरोगी जीवन जगले. आमचे आजोबा दादा म्हणजे चालत बोलत मिनी




कोर्टच होतं. कारण आसपासच्या सर्व खेड्यातील लोक दादांकडे गावातील वाद, शेतीवरुन भांडणे, वाटण्या प्रकरणे, मुली बाळांचे सासरचे प्रश्न असोत, घेऊन येत आणि दादा कोणावरही अन्याय न होऊ देता ते प्रश्न सोडवून देत असत. लोकन्यायालयात देखील दादांना बोलावले जायचे. एखादी गरजू व्यक्ती दादाकडे आली आणि दादांनी त्यांच्या प्रश्नांत लक्ष घातले नाही असे कधी झाले नाही. मग ते पोलीस स्टेशन असो, तहसील कचेरी किंवा कोर्ट जबरदस्त व्यवहारज्ञान आणि निर्णय क्षमता असलेले व्यक्तीमत्त्व म्हणजे आमचे दादा. देशाला ज्याच्यामुळे स्वातंत्र्य मिळाले ते हुतात्मे झाले, पण आज देश शिपाई पासून साहेंबापर्यंत लबाडांनी पोखरला आहे. ही खंत त्यांना नेहमी वाटत होती. त्यांनी कधीही कोणाकडून एक रुपयाची अपेक्षा केली नाही. दादांना मोह नव्हती याचं खुपच आगळ दादांना मोह नव्हती याचं खुपच आगळ वेगळ उदाहरण म्हणजे दादांना मामा नव्हते. त्यामुळे आईकडील शंभर एकर जमीन त्यांना मिळत होती, पण मोठ्या उदारहस्ते शंभर एकर जमीन न स्वीकारता सौंदणे येथील माने परिवाकडेच ठेवली. दादांनी कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती, ग्रामपंचायत सदस्य, विकास सोसायटी चेअरमन, अशी पदे भुषवले. त्यांचा काम करण्याचा एक वेगळाच हातखंडा होता. भूमिका नेहमी न्यायाची होती. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी आणि सर्व पक्षीय नेते यांच्यामध्ये त्यांचा धाक व दरारा होता. कामावरुन एक किस्सा आठवला. एकदा रमजान ईद च्या आदल्या दिवशी महबूब नगर, बुधवार पेठ येथील पाणीपुरवठा लाईन खराब झाली, तेव्हा मुस्लीम समाज दादांना भेटायला गेले. दादांनी सांगितले की घरी जा उद्या पाहटे तुमच्या नळांना पाणी येईल. रात्रीत पाईपलाईन बदलून पहाटे लोकांना नळाला पाणी पुरवठा केला दादांनी. आपल्या कौटुंबिक जीवनात सुध्दा त्यांनी कायम शिस्त, संस्कार व कष्ट यांना कायम स्थान दिले. कायम त्यांना खंबीर साथ दिली ती आंम्हा सवार्ची मायेची सावली, प्रेमाची माऊली, आमची आजी सौ. तारामतीताई यांनी म्हणूननच आज दादाचे सुपुत्र आमचे मामाश्री अशोक आण्णा गायकवाड, कौशिकतात्या गायकवाड, सुरेशबापू गायकवाड, मुली, सुना, नातवंडे प्रेमाने गोकूळात नांदत आहेत. आंम्ही नातवंडे आयुष्यात ऐश्वर्य बरोबरच कष्ट, संस्कार, नितिमत्ता आणि समाधान याला महत्त्व दिले पाहिजे हे त्यांच्याकडून शिकलो. आजच्या या स्मृतीदिनी कै. दादांना भावपूर्ण विनम्र अभिवादन.

**- सौ. शुभांगी तुकाराम लंबे (माने)**

# मी पाहिलेले दादा

दादा, आपले सर्वांचे आवडते, सर्वांना आपलेसे करणारे महान व्यक्तिमत्व. त्यांना प्रथमतः विनम्र अभिवादन. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, थोर समाजसेवक, प्रगतशील बागायतदार तर ते होतेच पण मायाळू पण खूप होते. जसजसा त्यांच्या कुटुंबीयांशी परिचय वाढत गेला तसा मला दादांच्या प्रेमळ स्वभावाचा उलगडा होत गेला. आयुष्यभर त्यांनी काळ्या आईची सेवा केली. रात्रं न दिवस शेतात कष्ट करून त्यांनी मळा फुलवला. त्यांच्या सोबत सौ ताईनी ही बरोबरीने शेतात कष्ट केले. दोघांनी मिळून मळ्याचे नंदनवन केले. माझा जसा जसा दादांच्या कुटुंबामध्ये परिचय वाढत गेला





तसा मला त्यांच्या आणि त्यांच्या घरातील सगळयांच्या प्रेमळ स्वभावाचा उलगडा झाला. घरातील लहान थोर सवार्नाच त्यांनी अतिशय चांगले वळण लावले आहे घरातील प्रत्येकाला सुसंस्कार व शिक्षणाची शिदोरी दिली आहे. त्यांनी सूना आणि मुली यांच्यात कधी भेदभाव केला नाही. सुनांना सुद्धा स्वतःच्या मुली सारखी वागणूक दिली. सौ.ताईनी पण सुनांना मुलीप्रमाणे सांभाळले. घरात लहान थोर सवार्नाच त्यांनी अतिशय चांगले वळण लावले आहे. घरात आज ही सर्वजण एकोप्याने व गुण्यागोविंदाने नांदत आहेत. दादांच्या प्रेमळ स्वभावाचा व समाजकायार्चा वारसा त्यांची मुले, नातवंडे हे पुढे चालवत आहेत. एकंदर गायकवाड कुटुंब हे एक आदर्श चौकातील आदर्श कुटुंब आहे. अश्या या आदर्श कुटुंबातील श्री दादांना विनम्र अभिवादन.

**- सौ. साधना घाटगे, मोहोळ**

## प्रबोधन

# दुर्दैवी देशाचे । कराया कल्याण

लहान मुलांच्या गोष्टीत प्राण्यांची सभा भरते. जंगलाचा राजा सिंह हा सभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. बाकीचे मांसाहारी प्राणी त्याचे अधिकारी, मंत्री वगैरे असतात. ससा, हरीण असे शाकाहारी प्राणी प्रजाजन असतात. सिंह रोज एका शाकाहारी प्राण्याने राजासाठी बलिदान करावं, अशी आज्ञा करतो. नंतर रोज एका शाकाहारी प्राण्याला तो फस्त करीत राहातो. या गोष्टीतून आपण मुलांना जंगलाचा कायदा कसा क्रूर असतो, ते सांगतो. पण त्यावेळी मानवी समाजव्यवस्थासुद्धा जंगलच्या कायद्यानुसारच चालतात, हे का सांगत नाही? शहाणी मुलं मात्र मोठी झाल्यावर 'जंगलचा कायदा' हाच आमच्या राज्य- व्यवस्थांचा पाया आहे, हे सत्य जाहीर करू लागली, तर त्यांचं काय चुकलं? जंगलचा कायदा आणि मानवी कायदा यात फरक नसतो, हे सुज्ञ नागरिकांना रोज अनुभवावंही लागतं आणि कळतही जातं. आयुष्य संपतं, पण लहानपणी वाचलेली सिंहाची क्रूर कथा माणसाची पाठ सोडत नाही, ही शोकांतिका नव्हे? पाच वर्षांतून एकदा घटनेच्या आदेशानुसार निवडणुका जाहीर होतात. जंगलाच्या कायद्यानुसार जो मांसाहारी प्राण्यासारखा दणकट, बळकट, क्रूर, धाडसी, धोकेबाज, सावध, उत्तम हल्लेखोर, तो उमेदवार विजयी होतो. ससे, हरणं, गाढवं, घोडी, माकडं, हत्ती, जिराफ असे सगळे शाकाहारी प्राण्यांसारखे निरुपद्रवी प्राणी भाबड्या उत्साहाने मतदान करतात. आपण ज्यांना निवडून देत आहोत, ते कधी काळी खरोखर वाघ-सिंह होते किंवा त्यापैकीच काही आज गायी-बैलाचे कातडे पांघरुण आलेले क्रूर, घातकी प्राणीच आहेत; हे ते सवयीने विसरून, उत्साहाने रांगा लावून मतदान करतात आणि मतपेटीतून अवतरतो, वाघ-सिंहापेक्षा अधिक क्रूर लोकप्रतिनिधी ! त्याची निवड झाली, की सुरू होते रोज रतीब घातल्यासारखे गरीब बापड्या नागरिकांच्या आशा-आकांक्षांचे बलिदानसत्र; ते थेट पुढच्या हिटलर-स्टॅलिन-माओ यांची आठवण व्हावी, निवडणुकांपर्यंत चालतच राहातं.

छत्रपती शाहू महाराज हे थोर विचारवंत होते. दलितांच्या सभेत एकदा ते अध्यक्षपद भूषवण्यासाठी गेले असता उपस्थित दलित बांधवांनी त्यांना तुम्हीच आमचं नेतृत्व करा, असं आग्रहाने, अगत्याने आणि कळवळून सांगितलं. पण भाषण करताना राजर्षी छत्रपती शाहू म्हणाले, 'मित्रांनो तुमची विनंती मला मान्य होणं हे चुकीचं आहे, असं मला वाटतं. तुम्ही प्राणीविश्वाकडे पाहा. सिंहाच्या कळपाचं नेतृत्व सिंहाकडेच असतं. हत्ती आपल्या कळपाचा नेता म्हणून हत्तीचीच निवड करतात. समाजाच्या स्थितीगतीनुसार, समाजात जे अनेक गट असतात, जाती असतात त्यांनी आपल्यातील व्यक्तीलाच नेता मानणं आणि नेतृत्व त्याला बहाल करणं उचित आहे.' भारतातील शासनव्यवस्थेचे दोष अनेक आहेत, हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट आहे. ज्याच्याकडे मत्ता (संपत्ती) त्याच्याकडे सत्ता जाते. हा या गरीब देशातील अपवादरहित नियम होत चालला आहे. पण करोडपती उमेदवार हा झोपडवासीयांचा नेता होऊ शकतो काय? कामगारांचा नेता डॉक्टर कसा असतो? वा त्यांचेही उद्योग-धंदे कसे असतात? सभ्य, शिक्षित नागरिकांवर नेता म्हणून एखाद्या तडीपार गुंडाला निवडून देण्याची वेळ येणं योग्य आहे काय ? सिनेकलावंताना गरीब माणसाची भूमिका वठवून गौरव पुरस्कार मिळवता येतील. पण गरिबांच्या दुःखाचं अंतरंग त्याला कळेल का? मग तो गरिबांचं नेतृत्व करण्यास लायक कसा असेल? भगवे पांघरलेला संन्यासी गृहस्थांची मते मागू लागला, तर तो किती लबाड आहे, हे लोकांच्या लक्षात का येऊ नये? त्याला त्याची जागा लोकसभेत नाही, त्याच्या मठात आहे हे मतदारांनी त्याचा कान पिरगाळून सांगायला नको का? ज्याच्या क्रूर कृत्यांनी अशा व्यक्ती सत्य, अहिंसेच्या मार्गावरून चालणाऱ्या, पंचशील तत्त्वांचं जगाला दर्शन घडवणाऱ्या देशाच्या 'हीरो' व्हाव्यात, हा देशाचा दुर्दैवी अधःपात नव्हे?

आज देश एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपल्याचं चित्र अत्यंत स्पष्ट दिसतं आहे. आम्ही आमच्यासाठी शांतताप्रेमी, सहिष्णुतावादी, राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेने जाणार की क्रौर्य, हिंसा, अत्याचार, अमानवीयता, फुटीरपणा, गटतटबाजी यांचा मार्ग धरणार आहोत? या प्रश्नाचा निर्णय कर्तव्यकठोर बुद्धीने घ्यावा लागणार आहे. या बाबतीत आपण चूक केली, तर भावी काळ समस्त भारतीयांना कठोर शिक्षा ठोठावायला कमी करणार नाही.

केवळ मतदानाचा हक्क बजावून नागरिकांचं काम संपत नाही, तर कोणाकडे कोणतं खातं असावं याचा आग्रहसुद्धा लोकशक्तीने धरला पाहिजे. अशिक्षिताला शिक्षणमंत्री, धोरण नसलेल्याला अर्थमंत्री, भित्र्या माणसाला संरक्षणमंत्री करणे, हा देशाचा घात तर आहेच; पण तो नागरिकांच्या पवित्र मताचा अपमानही आहे. तो टाळायचा कसा? कारण आज-

राजकारण हा । व्यवसाय आहे
नफ्याची जो वाहे । सदा चिंता ॥ १
लोकशाही आता। झाली ठोकशाही
मूल्यांचा न राही । मुलाहिजा ॥ २
लोकशाहीजागी । येते राजेशाही
किंवा गुंडशाही । धार्मिकांची ॥ ३
संसदेला डाग । लाविती महंत
सिनेकलावंत । मूल्यशून्य ॥४
घराणेशाहीचे । पसरले विष
करी सर्वनाशे भारताचा ॥५
वैफल्य येतसे । विचारी लोकांना
देशाची ही दैना । पाहू जाता ॥६
पूवीर्ही नव्हती । कल्याणाची दिशा
आजची दुर्दशा । पुन्हा भिन्न ७
दुदैर्वी देशाचे । कराया कल्याण
काढा ढवळून । जनमना !



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापूर टपाल विभागाने रचला इतिहास

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विभागाचे वरिष्ठ अधीक्षक के. नरेंदर बाबू यांच्या अथक प्रयत्नांनी आणि सक्षम नेतृत्वाखाली सोलापूर विभागाने २०२४ २०२५ या आर्थिक वर्षात सर्व निकषांमध्ये सर्वोत्तम कामगिरीसाठी सर्वोत्कृष्ट विभाग पुरस्कार जिंकला आहे.पुणे येथे पार पडलेल्या क्षेत्रीय पुरस्कार वितरणाच्या सोहळ्यात मुंबई, मुख्य पोस्टमास्टर जनरल महाराष्ट्र परिमंडळ अमिताभ सिंह, पुणे क्षेत्राचे जनरल पोस्टमास्टर रामचंद्र जायभाये आणि पुणे क्षेत्राच्या डाक निदेशिका सुश्री सिमरन कौर यांच्या उपस्थितीत सोलापूर विभागाचे वरिष्ठ अधीक्षक के. नरेंदर बाबू यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०२४- २५ आर्थिक वर्षाचा पटकावला प्रथम पुरस्कार हे



यश विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना समर्पित असून सोलापूर विभागाचे कितीर्मान आणि यशाचा ध्वज असाच उंच ठेवण्यासाठी आपण यापुढेही संघटित होऊन बंधुभावाने कार्य करत राहू या, असे आवाहन बाबू यांनी केले. अमिताभ पुणे क्षेत्राचा मानाचा फिरता चषक २०२४-२५ या वर्षासाठीचा सोलापूर विभागाने पटकाविला. या गौरव समारोह सोहळयात सर्वोत्तम विभाग पुरस्काराव्यतिरिक्त, सोलापूर विभागाला विविध श्रेणींमध्ये आणखी १२ पुरस्कार मिळाले. सोलापूर जिल्ह्यासाठी कर्मचाऱ्यांनी केलेल्या अविरत परिश्रमातून हे यश मिळविले आहे. यामध्ये सर्व जी. डी. एस. एम. टी. एस., पोस्टमन, सॉर्टिंग पोस्टमन, मेल ओव्हरसियर, पी.ए.,एस.पी. एम., ओ.ए., आय.पी.,ए. एस. पी. यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

# राज्य शासन दुष्काळग्रस्त भागाला पाणीदार करून सिंचन वाढवण्यासाठी कटिबद्ध - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासन दुष्काळग्रस्त भाग पाणीदार करण्यासाठी विविध जलसंधारणाची कामे राबवत आहे. दुष्काळग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करणे व सिंचन क्षमता वाढवणे यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सांगोला येथे आयोजित भीमसैनिकांनी उभारलेल्या निधीतून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे तसेच माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या आमदार निधीतून साकारण्यात आलेल्या भव्य स्मारकाच्या अनावरण प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मार्गदर्शन करत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन विकास मंत्री शंभूराज देसाई, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत म्हैसाळ उपसा सिंचन योजना व सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी 3 हजार कोटीच्या निधीला मान्यता दिलेली आहे. ताकारी व म्हैसाळ या दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. सांगोला तालुक्याला देखील सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्यात येणार आहे. शासन दुष्काळग्रस्त भागाला पाणीदार करून त्या भागातील सिंचन क्षमता वाढवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

ह्या शासनाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श विचारावर चालत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जे संविधान दिलेले आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळत आहे. जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाऊलखुणा आहेत तो भाग शासनाच्या वतीने विकसित करण्यात येत असून, त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येत आहे. आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही असेही त्यांनी सांगितले.

सांगोला तालुक्याचे विकासासाठी भरघोस निधी देण्यात आलेला असून पुढील काळातही सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू दिल्या जाणार नसल्याचे त्यांनी सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी 50 लाखाचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच सांगोला येथील एमआयडीसी जागा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येतील असेही उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांच्या या स्मारकातून आपण बाबासाहेबांचे विचार समता, स्वातंत्र्य व बंधुता हे सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू. शासन समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून सांगोला तालुक्याचा ही विकास करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई या मान्यवरांच्या हस्ते सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूणार्कृती पुतळा व त्यांचे भव्य स्मारक या अनुषंगाने प्रस्ताविक केले. या कार्यक्रमास हजारो भीमसैनिक उपस्थित होते.

### आरोग्य शिबिर

सांगोला येथे आयोजित आरोग्य शिबिराला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन ते पुढे म्हणाले की गेल्या अडीच वर्षात शासनाकडून मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवेचे काम केले असून, मुख्यमंत्री सहायता निधीतून 450 कोटी रुपये देण्यात आले. राज्यात हजारो रुग्णांचे प्राण वाचवण्याचे काम या मुख्यमंत्री सहायता निधीतून केले. काही आजारावरील उपचाराचा खर्च सामान्य कुटुंबांना परवडणारे नसतात. सामान्य कुटुंबातील नागरिकांना मोठ्या आजारावरती तात्काळ उपचार मिळावेत यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेची मयार्दा दीड लाख रुपयांपर्यंत होती त्याची शासनाने मयार्दा वाढवून पाच लाख रुपये पर्यंत केली आहे. तसेच त्यामधील अटी शर्ती देखील कमी करण्यात आल्या आहेत. राज्यातील साडेबारा कोटी जनतेला यातून आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने उष्णतेची लाट मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. यासाठी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

# मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे दिनांक 12 व 13 एप्रिल 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.

शनिवार दिनांक 12 एप्रिल रोजी दुपारी 2.00 वाजता बेलोरा विमानतळ अमरावती येथून खाजगी विमानाने सोलापूरकडे प्रयााण. दु. 04.00 वा. सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण दुपारी 04.10 वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे आगमण व राखीव. सायंकाळी 05.15 वा. शासकीय विश्रामगृह येथून मोटारीने नेहरूनगर कडे प्रयाण. सायं. 05.30 वा नेहरून नगर येथे आगमन व स्व. चंद्राम रामचंद्र चव्हाण (गुरूजी) यांच्या पूणार्कृती पुतळा कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी 07.30 वा.नेहरूनगर येथून आधार क्रिटीकल केअर हॉस्पीटल येथ आगमन व हॉस्पीटलच्या उद्घाटनास उपस्थिती. रात्री 08.30 वा. श्री युवराज (भैय्या) राठोड यांच्या निवासस्थानी आगमन व सदिच्छा भेट व सोयीनुसार शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण व मुक्काम. रविवार दि.13 एप्रिल 2025 रोजी सकाळी 09.45 वा .शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून मोटारीने सोलापूर विमानतळकडे प्रयाण व सकाळी 10.00 सोलापूर विमानतळ येथून खाजगी विमानाने मुंबई कडे प्रयाण करतील.

## वात्रटिका

### हर्ष वाटे परतीचा

हातात होते घड्याळ
पुन्हा घेतले कमळ...
तुतारी वाजवताना
पुन्हा होते तळमळ...
इथं राहू की तिथं जाऊ
इथं उपाशी तिथं तुपाशी...
भरले ताट खुणावते आहे
करावी वाटते घर वापसी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**



सस्नेह निमंत्रण

# स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशिय व संशोधन संस्था, मोहोळ

यांचे वतीने व

# रेड स्वस्तिक सोसायटी, भारत

यांचे सहकार्याने

# संदिपान दादा गायकवाड

यांचे स्मृतिदिनानिमित्त

## मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान महाशिबीर उद्घाटन

उद्‌घाटक



मा. श्री. जयराज वडणे
जिल्हा न्यायाधिश

अध्यक्ष



मा. डॉ. सुहासजी व्यवहारे
सहयोगी प्राध्यापक, टेक्सास A & M विद्यापीठ, अमेरिका

**शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.४५ वाजता | स्थळ : स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड सभागृह, सोलापूर रोड, मोहोळ**

## स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड कृषिरत्न पुरस्कार

शुभहस्ते



मा. श्री. राजनजी पाटील
(माजी आमदार)
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद



मा. श्री. वसंतराव मालुंजकर
अध्यक्ष, जिल्हा संचालक,
रोटरी क्लब सदस्य क्रेडाई

## सन्माननीय उपस्थिती



विशेष सत्कार मुर्ती
मा. डॉ. अशोकजी घोणे
वरिष्ठ मानद सल्लागार,
जहाँगिर हॉस्पीटल, पुणे



मा. डॉ. राम पाटील
न्यूरो सर्जन, एस.व्ही.
देसाई नेत्र रुग्णालय



मा. श्री. अनिलजी ढगे - पाटील
सहाय्यक सहकारी अभियोक्ता



मा. डॉ. प्रविण मासाळ
स्त्री रोग तज्ञ, मॅक्सकेअर
मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल



मा. डॉ. जे. एस. दुगल
हृदयरोग तज्ञ,
जहाँगिर हॉस्पीटल, पुणे



मा. डॉ. संजीव ठाकूर
अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन मेमोरियल
मेडिकल कॉलेज, सोलापूर



मा. श्री. रोहनजी मालुंजकर
वास्तुविशारद



मा. डॉ. मंदार पाटील
न्युरो सर्जन,
जहाँगिर हॉस्पीटल, पुणे



मा. डॉ. सुनिल साळवे
अर्धांगवायू उपचार तज्ञ,
निरामय पॅरेलिसेस हॉस्पीटल



मा. ॲड. (डॉ.) क्रांतीकुमार महाजन
समन्वयक, रेड स्वस्तिक
सोसायटी, भारत



मा. डॉ. अमेय ठाकूर
असिस्टंट प्रोफेसर, डॉ. वैशंपायन
मेमोरियल मेडिकल कॉलेज, सोलापूर



डॉ. गुरतेज सिंग ब्रार
निसर्गोपचार आणि आहारतज्ज्ञ,
भटिंडा, पंजाब संचालक,
निरामय पॅरालिसिस सेंटर, पुणे



डॉ. सुब्रत जैन
डीएनबी, हृदयरोगतज्ज्ञ



श्री प्रमोद तुकाराम बाबर
पुळूज,तालुका पंढरपूर,
जिल्हा सोलापूर कृषी रत्न पुरस्कार



श्री. हरिश्चंद्र गडसिंग
निवृत्त परिवहन अधिकारी



मा. श्री. सुग्रीवजी व्यवहारे
प्रगतशील बागायतदार



मा. श्री. धनंजय पाटील
विभाग प्रमुख, स्थापत्य अभियंत्रिकी



मा. डॉ. मंजिरी पाटील
नेत्र रोग तज्ञ,
एस.व्ही. देसाई नेत्र रुग्णालये



मा. श्री. निरंजनजी गणपाटील
उद्योजक



मा. श्री. तुकारामजी डुबल
प्रगतशील बागायतदार



श्री. अशोकराव शिंदे

विनित



मा. श्री. कौशिक संदिपान गायकवाड
अध्यक्ष, स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशिय व संशोधन संस्था, मोहोळ

**यांचे प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५.१५ वा. स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड सभागृह, मोहोळ जिल्हा सोलापूर येथे संपन्न होणार आहे. तरी आपण उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित रहावे, हि विनंती.**